# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दुरध्वनी क्र: (०२५१) २७१०१०५, २७२०११६-१२५, फॅक्स नं,: (०२५१)-२७२०१०४
उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर - ४२१००३, जिल्हा ठाणे.

जा. क्रं. उमपा/अबांनिवि/ २१० /२०१८.
दिनांक:- ०९.०६.२०१८.

प्रति,

व्यवस्थापक,

सर्व सिनेमा गृह

उल्हासनगर -

विषय:- चित्रपटगृहात अनधिकृत जाहिरात फलकांबाबतचे आवाहन प्रसिध्द करण्याबाबत.

महोदय,

आपले उल्हासनगर शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी महानगरपालिकेने शहर अनधिकृत जाहितरात फले मुक्त करण्याचे निश्चित केले आहे. यानुसार सोबत जोडलेले आवाहन चित्रपटापुर्वी प्रदर्शित करून व चित्रपटगृहात लावून शहराच्या सौदर्यीकरणात हातभार लावावा, ही विनंती.

आपला

(संतोष देहरकर)
उप आयुक्त(मुख्यालय)
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दुरध्वनी कः (०२५१) २७१०१०५, २७२०११६-१२५, फॅक्स नं,: (०२५१)-२७२०१०४
उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर - ४२१००३, जिल्हा ठाणे.


जा. क्रं. उमपा/अबांनिवि/ २०४/२०१८.
दिनांकः- ०५.०६.२०१८.

प्रति,

प्रायार्य,

सर्व शासकीय
विद्यालय, कॉलेज
उल्हासनगर -

**विषयः- आपल्या महाविद्यालयात अनधिकृत जाहिरात फलकांबाबतचे आवाहन प्रसिध्द करण्याबाबत.**

महोदय,

आपले उल्हासनगर शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी महानगरपालिकेने शहर अनधिकृत जाहितरात फले मुक्त करण्याचे निश्चित केले आहे. यानुसार सोबत जोडलेले आवाहन आपल्या महाविदयालयात प्रसिध्द करून शहराच्या सौंदर्यीकरणात हातभार लावावा, ही विनंती.

(संतोष देहेरकर)
उप आयुक्त (मुख्यालय)
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दुरध्वनी क्र: (०२५१) २७१०१०५, २७२०११६-१२५, फॅक्स नं,: (०२५१)-२७२०१०४
उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर - ४२१००३, जिल्हा ठाणे.


---

जा. क्रं. उमपा/अबांनिवि/ २११ /२०१८.
दिनांकः- ०९.०६.२०१८.

प्रति,
सर्व राष्ट्रीय पक्ष
उल्हासनगर
.............................................

**विषयः- शहरात कोणत्याही ठिकाणी अनधिकृत बॅनर्स, पोस्टर्स, कटआऊटस, जाहीरात फलक, झेंडे इत्यादी न लावण्याबाबत.**

**संदर्भः- जनहित याचिका क्रं. १५५/२०११ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश.**

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये आपल्या निदर्शनास आणण्यात येते की, मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ मध्ये शहरात कोणत्याही ठिकाणी अनधिकृतपर्ण जाहीरात फलक, बॅनर, पोस्टर, होर्डीग, कटआउटस, झेंडे इत्यादी प्रदर्शित न करणेबाबत आदेश दिलेले आहेत. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. उच्च न्यायालयात वेळोवेळी सादर करण्याचे आदेश देखील मा. न्यायालयाने दिलेले आहेत. तसेच अशाप्रकारे जाहिराती प्रदर्शित केल्यास त्यांचेविरुध्द कारवाईचे आदेश देखील दिलेले आहेत.

तरी आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या पक्षामार्फत व कार्यकर्त्यामार्फत शहरात कोणत्याही ठिकाणी विनापरवानगी अनधिकृत जाहिराती प्रदर्शित होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. आपल्या पक्षाच्या सर्व कार्यकर्त्याना तशा सुचना आपल्या स्तरावर देण्यात याव्यात शहरात अनधिकृत जाहिराती प्रदर्शित केल्याचे निदर्शनास आल्यास संबधितांविरुध्द अधिनियमातील तरतुदीन्वये गुन्हे दाखल करून केलेल्या कारवाईचा खर्च वसुल करण्यात येईल व सदर बाब मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणुन देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(संतोष देहेरकर)
उप आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका